# प्रकरण चौथे

## " तहान " मधील जीवनचित्रण "

प्रस्तुत प्रकरणात तहान मधील जीवनचित्रणाचा विचार करण्याचे योजिले आहे. आपल्या मनोगतातच ग्रामीण भागासाठी लोण्या लागलेल्या कुरुजागारख्या दाखळण्या-या" ग्रामीण समाज व्यवस्थेचे चित्रण करण्या-या प्रतिमेचे चिंतन लेखक करतो. समकालीन ग्रामीण वास्तव याचे बदलते रूप, अर्थार्जनाच्या अपु-या संधीमुळे मनाची होणारी सैराट अवस्था, भौतिक सुखाची ओढ, चंगळवादाचे परिस्थितीतील ताणतात होणारे परिवर्तन अशा सा-या पटित ताणांचे चित्र या कादंबरीत लेखक सदानंद देशमुखांनी उतरले आहे.

या प्रकरणांत " तहान " मधील जीवनचित्रण खालील मुद्यांच्या आधारे विचारात घेऊ. सदर विभागणी विवेचनाच्या सोयीसाठी केलेली आहे.

१. ग्रामीण जीवनाच्या मूल्यांचे पडझडीचे चित्र.
२. ग्रामजीवनातील उतरंडी.
३. कोरड्या ठण्ण वातावरणातील माणसांची मन
४. राजकारण-अर्थकारण-समाजकारण-जातीयवृत्ती

१. <u>ग्रामीण जीवनाच्या मूल्यांच्या पडझडीचे चित्र :</u>

लेखक सदानंद देशमुख यांच्या " तहान " कादंबरीत आजच्या ख-या खेड्याचे चित्र मांडताना दिसतात. माणसामाणसातील विसंवाद, पैसा-चैन-स्वार्थ यातील ओढीमुळे त्यातच रुतत जाणा-या माणसांचे चित्र रेखाटतात.

पाणी टंचाईच्या काळातं पाण्यासारखी पंचमहाभूतापैकी एक शक्ती क्रय-विक्रयाची, राजकारणाची, स्वार्थाची, चंगळीची वस्तू होऊन बसते आणि जगणे दुर्भंगून जाते.

सदानंद देशमुखांनी पाणी टंचाईग्रस्त खेडेगावचे चित्रण करताना दोन पिढयात होणारा संघर्ष सच्चेपणानं चित्रित केला आहे. हा मूल्य संघर्ष आहे. एक पिढी मूल्ये जोपासू पाहते. काही एक संस्कृती असणारी मूल्ये मानणारी जुनी पिढी आणि पैसा हे एकच मूल्य मानणारी, व्यवसायात रुळलेली, गावातं टगेगिरी करुनं प्रसंगी चोरी-चोरीच्या आधारे घाला घालणारी नवी पिढी यामधील हा अटळ जीवनसंघर्ष आहे.

यातील मूल्ये जपणा-या पिढीचा प्रतिनिधी राघोजी शेवाळे आहे. त्याचं आपल्या बैलजोडीवर प्राणाहून अधिक प्रेम आहे. त्यामुळे त्याला पैसा कस्पटासमान आहे.

पाणी टंचाईच्या काळातं बबन शेवाळे आपल्या बैलांच्या जीवावर रगड पैसा मिळवितो. कमाईच्या नादात आपल्या मालकीच्या जमिनीतील कामं ही त्यानं तशीचं पडू दिली आहेत. शेतकरी म्हणून पाणवया होऊन नंबाट कमाई करतो.

एकटा बबनचं पाणी आणण्याच्या आणि पैसा मिळवण्याच्या वेडानं खुळावलेला नाही त्याची आई ही आता स्वप्नानी नादावली आहे. आपला मुलगा मुठीनं कमावतो म्हणून " तिच्या अंगाला मोराचे पिसारे फुटल्यासारखे झाले. पाण्याची धार दारात यावी, तशी नोटांची धार दारात येत होती ".[१] आता तिला सोन्याची पोथ आणि बांगडया घालायची स्वप्न पडू लागली आहेत.

बायको मुलांच्या या ओढा-ताणीत शेवाळे मात्र संतापतो आहे. त्याला बैलाकडे पाहणारी ही खाटकाची दृष्टी वाटते. अवघड वाटेनं बैल मोडतील हे भय त्याला कुरडतं. त्याचं वावर पोसणारे बैल त्याचं सर्वस्व आहेत. बायको मात्र त्याला घालून-पाडून बोलते, बेइज्जत करते म्हणून तो केविलवाणा होतो आहे. "बटकीचा पैसा माणसाले एवढं बदलवते ?"[२] त्याचं रक्त सळसळतं. बायकोची बडबड त्याचं काळीज कुरतडू लागते.

सगळ्या गावातच पाण्याने डोळे वासायला लावले आहेत. टापणीवर पाण्यावरून भांडणं सुरू होतात. पाण्यापायी रामा उमाळेची तेरा वर्षांची पोरगी कोरड्या विहिरीत पडून मरून जाते. पाण्याची कमाई ही तकलादू कमाई आहे म्हणून नांगर धरण्याची ओढ राघोजीला लागते. पण मुलगी भावाजवळ हट्ट करते. टी.व्ही. अन्. टेपरेकॉर्डर चा आईलाही टी.व्ही. हवा आहे. राघोजीला वाटते की " आरे ते उघडं कशाले आणतू बे. आपल्या कास्तकाराच्या घरात काय करायचा टी.वी. बबनला तर आपण व्यापारी झाल्यासारखे वाटते आहे. बबनला लोखंडी टाकीला तोटी असलेली टायरची गाडी घ्यायची आहे. आई त्याच्या खाण्याची काळजी करते आहे. आणि त्याचं तरुण मन, झोपडपट्टीतल्या रत्नाच्या मिषानं दूरदूर धावू लागलं आहे. गावातला शिकलेला प्रमोदही त्याच्यावर दात खाऊन आहे. " आपून बी.ए. होऊन आपली कमाई काय त चाळीस, पन्नास रुपये...ते बी कधी हायेत कधी नाईत...अन् हे धाकट तीन-चारशो त सहज कमावत असंल "[४] ही व्यथा त्याला बोचकारतो आहे. गावातली तरणीताठी पोरगी मरून जाते आणि मोहनसारखा तरुण मात्र म्हणतो -" सालं सम्द रगत झालं पाण्यात, खडकावर, काठावर आता काई ह्या इहिरीचं पाणी प्यायच्या कामी येत नाही"[५]

बबनला लागलेली तरुण चटकं गाडीकडेही दुर्लक्ष करवते. गाडी उलटते. चाक मोडल्यानं लंगडी होते. तो नवी गाडी बघायला जातो तेव्हा सतीश त्याला सांगतो की अनेकांना हाच पाण्याचा धंदा करायचा आहे, म्हणून त्यांना गाड्या हव्या आहेत. " असंच चालते भौ आपल्या गावात. एकानं किराणा दुकान टाकलं की समद्येच टाकतात...चक्की...ट्रॅक्टर....जीप...एकानं घेतलं की दुसरे घेतात. अन् मग समद्यायच्याचं धंदाच बडगं बसते. बसतात मग हारी हरी करत... गेंढीवळण हाये नुस्त. .गेंढीवळण...."[६] बबन दुःखातून मोडल्या औतासारखा उदास होतो. बबनचं लक्ष आता आपल्या बैलाकडं जातं. त्याच गळाटीलं रूप त्याला जाणवतं. घरी आल्यावर त्याला चारा टाकल्याचं समजतं. त्यानं रत्नाच्या गडबडीत बैलांना पाणीही पाजलं नातं. बाप मात्र आकांत करीत असतो आई आणि बहिण टी.वी. पाहण्यात मग्नं असतात.

आई पैसे मागणाऱ्या बबनला उत्तर मिळतं की पैसे सोनाराला दिले पोथे करायसाठी. पाणी पाणी करणारं गाव, पाण्याच्या जोरावर पैसे मिळवणारा बबन, आणि त्यातून राहिली स्वप्नं पूर्ण करणारी त्याची आई रामकोर, बैलांच्या शापानं व्याकुळणारा बाप राघोजी, असं एक गरगरणारं विश्व आपल्यापुढे साकारतं. शेजारचं पारखेड गाव आगीत राख होतं. गुराढोरांच्या आकांत, जळका उग्र वास यांनी आसमंत भरून जातो.

" आग झुंजायची तरी कशी ? पाणी तरी कुठून आणायचं ? घरात प्यायले पाणी नाई..."[७] ही व्यथा म्हातारे कोतारे सांगत राहतात. त्यांचे शब्द जणू कोळसा झालेले. आपल्या विडीपायी आग लागली म्हणून पुंजाजी जुमडे वेड लागल्यासारखा ओरडत राहतो.

शेवटी बैलांच्या कास-यानचं फाशी लावून मरतो. गावातं पाणी प्रश्नांवर उपोषण सुरु होतं.

बबनच्या मनात काहूर माजते. गावात टँकर आला तर पाण्यासाठी पैसे कोण मोजेल ? मनातील चीड व्यक्त करण्यासाठी तो बैलांना काठी हाणू लागतो. आपल्या कमाईवर जगणा-या लोकांसाठी तो बैलांना धापाधूम होतं मारु लागतो. पण त्याचं मन स्थिर नाही. " काम करु करु खायाले फुरसतं भेटत नाई. त्यापायी त्याहयच्या गब्दुल्या अंगाचे आता सांगाडे झाले. खरचं, आपून लय हरामी हाये. मुक्या जनावराची हेळणा लावली. आपल्याले हे पाप या जल्मी अनू ऊरलुर पुढल्या जल्मीही भोगावं लागेल..."[8] बबनं गहिवरुन रडू लागतो. सिराच्या चढावर तर बैलामधला जोम सरतो. गाडी मागे मागे सरकायला लागते.

गावातल्या मोर्चात लाठीहल्ला होतो. त्या झोंबाझोंबीत रायभोजीचा पाय मोडतो. बाबकोला वाटलं हा मोर्चात तडफडला, दवाखान्यावर खर्च झाला, तेवढ्यात सोन्याचा दागिना झाला असता. गावात हापशी जाते. पण घेणार पाणी साटकलतं ठेवण्याजोगं असतं. गावात टँकर येऊ लागतो. बबनची गि-हाईकं तुटतात. डाब्यावरही ड्रायव्हरेच्या कृपेनं टँकरच पाणी थोड्या पैशातं येऊ लागतं. बबन मात्र रत्नाच्या घोळामुळे पोलिसांच्या ताब्यातं सापडतो. सोमनाथसारखा पोलिसही जुन्या गोष्टी पुन्हा पुन्हा बोलतो. ' पाणी कधी फुकट मिळं नाही आणि आता पाया पडतो ' हे ऐकवत राहतो. प्रमोद मोहन-सोमनाथ बबनला दहा हजाराचा गंडा घालतात.

बबन आता मनाने थकतो. घरातला टी.व्ही विकून पैशाची भर करतो. भयानं घुसमटलेल्या वातावरणातं जगू लागतो. पाण्याचा धंदा थांबवतो. कादंबरीच्या शेवटी राघोजीला होणारे भास आपल्यापुढे येतात. गावातल्या दावणी सुनसान. गोटे सुनसान. ढोरचं काय, ढोरायचं शेणाची नाई...गाय नाई.,बैल नाई, वासरु नाई... म्हशी नाई...कुत्रे,गिधाडं कावळे.."[६] पाण्याची धार येते, रामकोर तोंड बाजूला करत नाही, तिची तहान मरत नाही. कावळ्याच्या काव काव आवाजात कादंबरी संपते.

ग्रामीण जीवनाच्या मूल्यांच्या पडझडीचे चित्र लेखक सदानंद देशमुख वास्तव पातळीवर रेखाटताना दिसतात.

२. ग्रामजीवनातील उतरंडी :

ग्रामजीवनातील उतरंडी लेखक सदानंद देशमुख रेखाटताना आपणांस दिसतात.

विदर्भातील चिखली -खामगांव यांना जोडणाऱ्या हमरस्त्यावर असलेल्या सारंगपूर गावातल्या बबन शेवाळे या तरुण शेतकऱ्याची, पाणी टंचाईन त्याला अचानक आलेल्या सुबत्तेची व टंचाई संपताच अपरिहार्यपणे आलेल्या दुर्दशेची कहाणी सदानंद देशमुखांनी " तहान " कादंबरीत मांडली आहे. गरिबीनं ग्रासलेल्या बबन शेवाळे, आपल्या जमीन,बैलावर जीवापाड प्रेम करणारा त्याचा लौकिक बाप राघोजी, नवऱ्याशी उळूळू भांडणारी त्याची आई रामकोर, निवरातं राबणारी तरुण बहिण वर्षा या चौघांचीच मुख्यत: जीवनकहाणी आहे.

नद्या, नाले आटतात. विहिरी कोरड्या पडतात. सारंगपूरची दुर्दशा उडते. पंचायतीच्या हापशीवर दांडे हलवून हलवूनं बायाबापड्या चुळकी चुळकीनं हंडे-मडकी उन्हातान्हांत, रात्री-बेरात्री तासन्तास रांगा लावून भरतात. व मेटाकुटीला येतात. गावाबाहेर, चार किलोमीटरवरच्या देवराव बापूच्या विहिरीला काय ते पाणी असतं पण तिथे जाणाऱ्या पिराच्या चढाचा रस्ता ट्रॅक्टरला देखील भारी पडतो. अन् गाडी बैलांना तर मरणकळा आणतो.

बबनच्या डोक्यांत पाणी विकण्याची कल्पना आकार घेते. बापाच्या विरोधाला न जुमानता तो आपल्या बैलांना पाण्याची टाकी वाहून न्यायच्या कामाला जुंपतो. नोकरदार, हॉटेलवाले, यांना पाणी विकून बंबाट कमाई करतो. पैशापाठोपाठ घरातं टी.व्ही. येतो. रामकोरच्या अंगावर सोन्याचा डाग मिरवू लागतो. खान्यातील बेसनं भाकर जाऊन चमचमींत पदार्थ येतात. नऱ्याचा पदोपदी उद्धार करणारी रामकोरं आपला मुलगा आपल्याला सुख देईल या कल्पनेनं, बबनच्या कौतुकानं मोहरून जाते.

घरातली पडेल काम करणारी, टी.व्ही. पाहणे, टेपरेकार्डर या स्वप्नात दंग होऊन तारुण्य हरवणारी वर्षा सदानंद देशमुखांनी प्रभावीपणे रेखाटली आहे.

गावातला शिकूनही नोकरी न मिळालेला प्रमोद नवले. घरची आर्थिक परिस्थिती गरिबीची. बाप गावातल्या शाळेत चपराशी. घरात चार भावडं आई वडिल असे कुटुंबात जन्माला आलेला प्रमोद बी.ए. झाल्यानंतर नोकरीसाठी वणवणं फिरतो, पण नोकरी मिळतं नाही. काही तरी धंदा सुरु करायचा तर भांडवल नाही. मुख्य रस्त्यांची जागा सोडली तर बाकी काही नाही. त्यामुळे ती जागा विकून नव्यानं

पडलेल्या बसस्टॅन्डच्या मागीलं बाजूस तेवढीचं जागा घेतो. खामगांव रोडला सरकारी जागेवर अतिक्रमणं करून पानाची टपरी घालतो. सुरवातीला जम बसतं नाही. मग औरंगपूरच्या पेपरची एजन्सी मिळवतो. जनवार्ता ह्या जवळच्या शहरातून निघणाऱ्या वृत्तपत्राचे वार्ताहरपद मिळवतो.

पत्रकार म्हणूनं चांगला प्रसिध्दीला येतो बबन शोवाळेच्या तो कमाईवर दातं खाऊन असतो तो म्हणतो - " आपून बी. ए. होऊनं आपली कमाई काय त चाळीस,पन्नास रूपये...ते बी कधी हायेत कधी नाईत...अन् हे धसकट् तीन चारशो त सहज कमावत आसंल..."[10] ही व्यथा बोलून जातो.

बबन शोवाळेला रत्ना प्रकरणांशी पत्रकार म्हणून ब्लॅकमेल करतो आणि आर्थिक लुटं करुनं घेतो.

मोहन काळे मॅट्रिक न होता गावच्या पंचायती करणारा, मतलबी वृत्तीचा मोहन गावभरातल्या बातम्या गोळा करुनं लोकांना फसवूंन पैसे मिळवतो.

कोरड्या विहिरींत पाण्यापायी तरणीताठी पोरगी पडूनं मेली त्यावेळी तो म्हणतो " झाल सम्दं रगतं झालं, पाण्यात, खडकावर काठावर, आता ह्या इहिरीचं पाणी प्यायच्या कामी येत नाई, कसेबी लोक चुळका-चुळका काढत व्हते. तहान भागवत व्हते. तिच्यातंबी झालं रगत. ."[11]

बबन शोवाळेला रत्ना प्रकरणांशी ब्लॅकमेल करणारे प्रमोद नवले, सोमनाथ हावरे यांच्याबरोबर मोहनही असतो.

पोलिस म्हणूनं ग्रामीण भागातील लोकांना धाक दाखवूनं लुबाडणूक करणारा, हप्ते खाणारा पोलिस सोमनाथ हावरे. बबनंशी वूनस

बाळगून असतो. बबनं रत्ना प्रकरणाशी सापडल्यानंतर बबनवर जुन्या गोष्टी पुन्हा बोलून दाखवतो. पाण्यांत कधी सुट दिली नाही. पोलिस म्हणून पाणी कधी फुकट दिल नाही या गोष्टी बोलूनं बबनला मारहाण करतो.

बबनकडूनं भिती दाखवून आर्थिक लूट करुन घेतो. बबनला गावातून परागंदा करण्यास सोमनाथ प्रवृत्त होतो.

गावातं पिण्याच्या पाण्याचा प्रश्न भेडसावतो आणि बबनं शेवाळे पाणी विकण्याचा व्यवसाय करतो. राघोजीचा बबनच्या व्यवसायाला विरोध असतो. बैलांचा सतत वापर केल्यामुळे बैल निकामी होतील आणि आपला परंपरागत शेतीचा व्यवसाय नीटपणे करता येणार नाही, अशी भितीची भावना राघोजीला त्रस्तं करत असते.

राघोजी शेवाळे गुरल्या व बल्यावर जीवापाड प्रेम करतो. बैलांवर असलेली त्याची माया आपल्या कुटूंबियापेक्षा अधिक आहे. बैलांच रावणं पाहून तो मनातल्या मनातं सतत तळमळतो. शेती आणि बैल हेचं त्याचं जगण्याचं बळ असतं. रामकोर आणि बबन त्याला आपले शत्रु वाटतात. बबनचा पाण्याचा व्यवसाय बंद पडावा आणि आपल्या बैलांची त्याच्या कामातून मुक्तता व्हावी म्हणूनं तो गावातल्या पाण्यासाठी चाललेल्या मोर्चा-सभामध्ये सहभागी होतो.

गावातल्या मोर्चात लाठीहल्ला होतो. त्या झोंबाझोंबीत राघोजीचा पाय मोडतो. अंथरुणात खिळून असणाऱ्या राघोजीला आपल्याशी कोणीतरी बोलतं असावं असं वाटतं असत. बबन तर आपल्या व्यापात रामकोर तर नेहमी वटवट करत असते.

बैलांवर प्रेम करणारा राघोजी, शेती हाच धर्म जपणारा, माणसं बदलली म्हणूनं रडणारा. सदानंद देशमुखांनी ताकदीने रेखाटला आहे.

शेजारचं पारखेड गाव आगीतराख होत. गुराढोरांचा आकांत जळका व उग्र वास यांनी आसमंत भरुनं जात.

" आग झ्रवायची तरी कशी ? पाणी तरी कुठून आणायचे ? घरातं प्यायले पाणी नाई...माती फेकूनं पाहयची पण ती थोडी काई चूल व्हती इजायले..."[12] ही व्यथा, म्हातारे कोतारे सांगत होते. त्यांचे शब्दही जणू कोळसा झालेले. आपल्या विडीपायी आग लागली म्हणून पुंजाजी ढुमडे वेडं लागल्यासारखा ओरडतं राहतो. शेवटी बैलांच्या का-यानचं फाशी लावूनं मरतो.

गुरं ढोर वांग्यागत होऊन मेली आणि पाणी नाही म्हणून झोंबून घेणारा गाव प्रभावीपणे चित्रित केला आहे.

रामा उमाळेची बायको विहिरी काठच्या झाडाखाली बसून भेसूर चेह-यानं भयानकं रडत होती. पाण्यासाठी वणवण फिरुन, पाण्यासाठी तरूण मुलगी गमावली म्हणून आक्रोश करणारी आई, तिचा आक्रोश सा-या आसमंत भरून येतो.

यातून ग्रामजीवनातील सा-या उतरंडी लेखक सदानंद देशमुखांनी प्रभावीपणे मांडल्या आहेत.

३. राजकारण-अर्थकारण-समाजकारण-जातीयवृत्ती

निसर्गाच्या अवकृपेला राजकारण-अर्थकारण-समाजकारण जातीयवृत्ती यातून निर्माण झालेले कोरडे हातपंप, डबक्यासारख्या विहिरी यांचे अस्तर लाभले आहे.

विदर्भातल्या खेड्या-खेड्यातून भयानकपणे जाणवणारी पाण्याची तीव्र टंचाई, आज शहरातं हा प्रश्न अद्यापही तेवढा भीषण नाही. मात्र खेड्यात ते त्याचे स्वरूप फार विक्राळ आहे. आंघोळ-धुणे-पुसणे हया नंतरच्या गरजा सोडल्या तरी मुळ गरजं पिण्याचे पाणी आणि हे

पिण्याचे पाणी सुध्दा मिळत नाही. मोठ्या प्रयत्नांनी... रात्रीच्या रात्री जागूनंही घडाभर पाणी हाताशी येत नाही, तेव्हा डोळ्याातले पाणी आपोआपचं आटून जाते. हे पाणी हाच " तहान " कादंबरीचा केंद्रबिंदू आहे. पाण्यासाठी होणारे खेडूतांचे हाल आणि त्या अनुषंगाने चितकटून जाणारी समाजव्यवस्था, माणसां-माणसामध्ये निर्माण होणारी दरी याचे अतिशय परिणामकारक चित्रण "तहान " मधून झाले आहे.

तहान फक्त पाण्याची नाही ती पैशाची, स्वप्नांची, जमिनीची, मायेची, कधी कधी सुडाची तहान आहे. एकच तहान वेगवेगळ्या पातळीवर न्याहाळताना कादंबरीचा उरत कल जाणवतो.

ग्रामजीवन, माती, कृषीकेंद्री वातावरण यातून हे तहानलेले कोरडेठण्ण चित्र जाणवते. आई असून पैसा आणणा-यावरचं मायेचा वर्षाव करणारी रामकोर, टी.व्ही. टेपरकार्डर या स्वप्नात दंग होतं तारूण्य दवडणारी वर्षा, गावातला शिकूनही नोकरी न मिळालेला प्रमोद नवले, मॅट्रीक न होता गावच्या पंचायती करणारा मोहन, पोलिस असलेला सोमनाथ हातरे, बैलांवर प्रेम करणारा, शेती हाच धर्म जपणारा, माणसं बदलली म्हणून रडणारा राघोजी, पाण्यापायी तरूण मुलगी गेली म्हणून आक्रोशणारी आई, गुरं ढोरं वांग्यागत होऊन मेली आणि पाणी नाही म्हणून आग विझली नाही हे सोसून घेणारं गाव हे सदानंद देशमुखांनी वास्तवपणे मांडले आहे.

पिण्याचे पाणी मिळवणे हे लोकांचे ध्येय होऊन असते. विदर्भातिल्या नरंगपूर नावाच्या महामार्गाशी जोडलेल्या एका खेडेगावा-तील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सदानंद देशमुखांनी अनेक बारकाव्यांसह आपल्या कादंबरीत मांडला आहे. उन्हाळ्यात तापणा-या उन्हाने जीवाची लाही लाही होते आणि पिण्यासाठी पाणीचं उपलब्ध नसते. गावातले हातपंप कोरडे, झालेले असतात विहिरी आटलेल्या असतात. नदी नालेही कोरडे ठन्न. पारखेडला आग लागल्यावर आग विझवायलाही

पाणी नव्हते. संपूर्ण गाव आगीत बेचिराख होते. सरकारी तेथडी मदतही गावकऱ्यांच्या हाती लागत नाही. सारंगपूरचे लोक शेजारी म्हणून त्यांना मदत करतात. प्यायला जिथे पाण्याची मारामार तिथे आग विझवायला पाणी तरी कुठून येणार. गावात काम करणारी ग्रामपंचायत, ग्रामसेवक, आमदार, अधिकारी मंडळी तर केवळ राजकारण करण्यासाठीचं आणि योजनांचे पैसे खिशात टाकण्यासाठीचं आतूर असतात. शासन दरबारी फारचं बोलबाला झाला तर पिण्याच्या पाण्याचे टँकर गावात पाठवले जातात टँकरवालेही चोरून हॉटेलवाल्यांना आणि ढाबेवाल्यांना पाणी विकतात. पाण्याच्या अभावामुळे संबंध गावाचे दैनंदिन जीवन विस्कळीत होताना दिसते. पिण्यासाठी पाणी नसल्यामुळे गावाची सामाजिक व्यवस्थाचं पूर्णपणे ढासळते. ढासळणाऱ्या ग्रामीण जीवनाचे सूक्ष्म चित्रण सदानंद देशमुखांनी " तहान " मध्ये केलेले आहे. पिण्याच्या पाण्यामुळे गावाचे जीवन आणि ग्रामव्यवस्थेत अनेक परिवर्तने होतात. माणसांची मन बदलतात. प्रवृत्ती बदलतात. सामाजिक जीवनाचे सर्वच आधार कोसळतात. आदरातिथ्य, पाहुणपण, नातीगोती, भावबंध असे सर्वच मानवीय संबंधाचे खांब कलमून जातात उरते फक्त मानवातील पशुत्व..

## ४. कोरड्या ठण्ण वातावरणातील माणसांची मन :

कोरड्या ठण्णं वातावरणांत जगता जगता माणसांची मनंही कोरडी, वांझोटी, निबारं, स्वार्थी झालेली दिसतात.

बबन शेवाळे सारखा तरूण आधी पैसा, मग स्त्रीसुख अशा भौतिक सुखाच्या मृगजळामागे धावते, आपले ग्रामजीवन, आपली कृषी-संस्कृती विसरुनं कचकड्याच्या शोभिवंत चकचकींत जगामागे धावतो. आणि शेवटी त्याच्या वाट्याला येते फक्त अपयश, जगण्याची - पैशाची कोंडी, स्वार्थापोटी विकटणारी बांडगूळांची दुनिया,

आणि त्याला नवे सगळे उपसून फेकून द्यावे लागते, पुन्हा जुन्या जगाशी सोयरीक जुळवावी लागते.

स्वप्न पाहणारे, स्वप्न पाहण्याचे बळ न उरलेले, स्वप्नांना गाडून अंध जगणारे. असे सारेचं या जगण्यातील जीव लावलेले त्या ताण्याबाण्यातून अवतरते. शेती, बैल, पाणी, जमीन यांचे अस्सल ग्रामीण विश्व. प्राण्यांवर प्रेम करणा-यांचे, त्यांना वापरले तर त्यांच्या हालामुळे कळवळणा-यांचे वेगळे जग त्यातही या लेखकाला माणसांच्या मनाचे चित्र अधिक मोलाचे वाटते.

बोलता-बोलता दुष्काळाच्या चाहुलीने हादरलेली गावातली माणसे म्हणतात " आमदार-खासदार लोकांचे दौरेही नाही " आता दौरे कशाले काढतीनं ते । ए. सी. अन्. कुलरचा गारवा सोडून ".[१३]

बबन शेवाळे कास्तकाराचा पोरगा असूनही शहरीमाणसांची स्वप्न बघतो. " आता दुकान टाकून ट्रीपा मारायच्या, आपल्या सात पिढयानं कमायचे नसतील एवढे पैसे कमवायचे. ..बंगलाच बांधतो मग आपून ".[१४]

आपल्या धंदात आणखी कोणीतरी शिरतील म्हणूनं बबन घाबरतो तेंव्हा सतिश म्हणतो - " असचं चालेते भौ आपल्या गावातं एकानं किराणा दुकानं टाकलं की समदेचं टाकतात....चक्की मेटॅडोर ...जीप. एकान घेतल की दुसरे घेतात अन् मग समद्याच्याचं धंदाच बडगं बसतात. मग हारी हारी करतात...मेंढीवळणा हाये नुस्त...".[१५]

बबन मात्र रत्नाच्या चोरीमुळे पोलिसांच्या तावडीत सापडतो. सोमनाथ सारखा पोलीसही जुन्या गोष्टी बोलतो. "पाणी कधी फुकट दिलं नाही आणि आता पस्तावा पडतो " हे ऐकवत राहतो.

गावातली एक तरुणीसाठी पोरगी मरुनं जाते आणि मोहनसारखा तरुण मात्र म्हणतो - " सालं सम्दं रगतं झालं पाण्यातं, वडकावर, काठावर आता ह्या इहिरीचं पाणी क्याच्या कामी येत नाई. कसेबी लोक चुळका-चुळका काढत व्हते. तहान भागवत व्हते. तिच्यासंबी सालं रगतं "...[१६]

गावतला शिकलेला प्रमोद नवले बबन शेवाळेच्या कमाईवर दात खाऊन आहे " आपून बी. ए. होऊन आपली कमाई काय त चाळीस, पन्नास रुपये...ते बी कधी हायेतं कधी नाईत.. अन् हे थसकट तीन चारशे त सहज कमावंत आसलं...[१७] ही व्यथा त्याच्या मनाला बोचकारते.

सा-या गावाला पाणी विकणारा बबन शेवाळे याच्या घरात पाणी नसल्याच्या कल्पनेनच हैराण होतो. गल्लीतले माणूसं त्याच्या आई व बहिणीला तांब्याभर सुध्दा पाणी देत नाहीत. ही गावकऱ्यांची सुडाची तहान आपणास दिसते.

पाण्यासाठी दाही दिशा फिरणारी माणसं, निसर्गाची अवकृपा झालेल्या वैराण वातावरणांत वावरणारी माणसं तशीचं रखरखीत चिडचिडी न होतील तरचं नवल!

सारांश :

राघोजी, बबन, रामकोर, वर्षा यांच्या कुटूंबचित्राला भिमराव शेवडेचे राजकारण, शिकलेल्या प्रमोदचे अर्थकारण, गावभरातल्या बातम्या गोळा करणाऱ्या मोहनची मतलबी वृत्ती, होर्गेच्या

दुकानातील व्यापारीवृत्ती, धाब्यावरचं जगन, अतिशय पैशासाठी कुरूप पोरीशी लग्न करून जीवनात धडपड करणारा..या सा-याच्या आयुष्याचे ताणेबाणे विनत एक दीर्घ माणूसपट सदानंद देशमुखांनी विणला आहे.

माणसाच्या मनाचा गुंता, तरूणपणातील ओढ, हातात अचानक पैसा आल्यामुळे येणारी मस्ती, यांचा कोलाज या कादंबरीत साकारतो. आजच्या ख-या खेड्याचे चित्र आहे. निसर्गाच्या अवकृपेला राजकारण अर्थकारण समाजकारण जातीयवृत्ती यातून निर्माण झालेले कोरडे हातपंप, डबक्यासारख्या विहिरी यांचे अस्तर लाभले आहे. ही तहान फक्त पाण्याची नाही ती पैशाची, स्वप्नांची, तळमळीची, मायेची, तर कधी कधी सुडाची तहान आहे.एकच तहान वेगवेगळ्या स्तर पातळीवर न्याहळताना कादंबरीचा खरा कस जाणवतो.

ग्रामजीवन, माती, कृषीकेंद्री वातावरण यातून हे तहानलेले कोरडेठण्ण विश्व जाणवते. आई असून पैसा आणणा-यावरचं मायेचा वर्षाव करणारी रामकोर, टी.व्ही. टेपरेकॉर्डर या स्वप्नात दंग होत तारूण्य दवडणारी वर्षा, गावातला शिकूनही नोकरी न मिळालेला प्रमोद, मॅट्रीक न होता गावच्या पंचायती करणारा मोहन, पोलिस, असलेला सोमनाथ, बैलांवर प्रेम करणारा शेती हाच धर्म जपणारा माणसं बदलली म्हणून रडणारा राघोजी, पाण्यासाठी तरूण मुलगी गमावली म्हणून आक्रोशणारी आई, गुरढोरं भाकल्या वांझ्यागत होऊन मेली आणि पाणी नाही म्हणून आग विझली नाही हे झोंबून येणारं गाव, यातून ग्रामजीवनातील उतरंडी उभारल्या जातात. स्वप्न पाहणारे, स्वप्न पाहण्याचे बळ न उरलेले, स्वप्नांना गाडून तंब जगणारे असे सारेच या जगण्यात जीव लावलेले. त्या ताण्याबाण्यातून उलगडते. शेती, बैल, पाणी जमीन त्यांचे अस्सल ग्रामीण विश्व. प्राण्यांवर प्रेम करणा-यांचे, त्यांना वापरले तरी त्यांच्या हालामुळे कळवळणा-यांचे, त्यांना साधन मानून मौज करणा-याचे वेगळेच जग

त्यातही या लेखकाला माणसांच्या मनाचे चित्र अधिक खोलाचे वाटते.

कोरड्या ठण्ण वातावरणांत जगता जगता मनही कोरडी वांझोटी, निबार, स्वार्थी झालेली दिसतात.

कादंबरी पळणावळणानं एका घट्ट पिळदार, बहुपदरी, बहुपेडी जीवनाचं अनेक पातळ्यांवरील चित्र साकार करते.

ही कादंबरी खेड्यातील जीवन, त्यातील कष्ट, मेहनत, स्वप्न, मातीशी असलेले नाते, अडचणींची निमित्ते शोधून लुटणारे, सैरभैर वाटांनी धावणारी अचपळ मने, विपरीत जीवनाच्या वाटांचे दर्शन घडते. ही ग्रामीण प्रवाहातील महत्वाची ताजी कादंबरी वाटते.

## प्रकरण चौथे

### संदर्भ ग्रंथ


| | | |
|---|---|---|
| १. | देशमुख सदानंद | " तहान " कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे १९९८, प्र. आ. पृ. ६ |
| २. | तत्रैव | तत्रैव पृ. ९ |
| ३. | तत्रैव | तत्रैव पृ. २९ |
| ४. | तत्रैव | तत्रैव पृ. ४७ |
| ५. | तत्रैव | तत्रैव पृ. ५१ |
| ६. | तत्रैव | तत्रैव पृ. ६६ |
| ७. | तत्रैव | तत्रैव पृ. ८२ |
| ८. | तत्रैव | तत्रैव पृ. १०१ |
| ९. | तत्रैव | तत्रैव पृ. २०५ |
| १०. | तत्रैव | तत्रैव पृ. ४७ |
| ११. | तत्रैव | तत्रैव पृ. ५१ |
| १२. | तत्रैव | तत्रैव पृ. ८२ |
| १३. | तत्रैव | तत्रैव पृ. ५३ |
| १४. | तत्रैव | तत्रैव पृ. |
| १५. | तत्रैव | तत्रैव पृ. ६६ |
| १६. | तत्रैव | तत्रैव पृ. ५१ |
| १७. | तत्रैव | तत्रैव पृ. ४७ |